RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : १७

दि. ०५ मे २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## आजचा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व, पश्चिम बंगालच्या विजयानंतर नरेंद्र मोदींनी कार्यकर्त्यांसह जनतेचे मानले आभार!

नवी दिल्ली : पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुदुचेरी या ५ राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल लागला आहे. पाचपैकी तीन राज्यात भाजपाचा विजय झाला आहे. दरम्यान, संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठं यश मिळालं आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांच्या निकालात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. तब्बल १५ वर्ष सत्ता असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला. या विजयाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात मोठा जल्लोष साजरा करण्यात आला.



विशेष म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी बंगाली धोती-कुर्ता परिधान करून भाजपाच्या मुख्यालयात दाखल झाले. यावेळी बंगाल, आसाम आणि पुदुचेरी निवडणुकांमधील पक्षाच्या विजयानिमित्त जल्लोष साजरा करण्यात आला. नरेंद्र मोदींच्या मुख्यालयातील आगमनानंतर भाजपा कार्यकर्त्यांनी ''४ मई, ममता गई'' अशा घोषणा देत त्यांचं जंगी स्वागत केलं. तसंच भाजपाचं बंगालमधील प्रचारगीत ''पोरिबर्तनो दरकार, चाई बीजेपी सरकार'' वाजवण्यात आलं. नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील पक्ष मुख्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केलं. ते म्हणाले, ''आजचा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीचं फळ मिळाल्यावर जो आनंद होतो, तोच आनंद आज देशभरातील भाजपा कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर मला दिसत आहे. एक कार्यकर्ता म्हणून, मी प्रत्येक भाजपा कार्यकर्त्याच्या आनंदात सहभागी आहे. आजचा दिवस अनेक अर्थांनी खास आहे. हा देशाच्या उज्ज्वल भविष्याची घोषणा करण्याचा दिवस आहे. हा विश्वासाचा दिवस आहे. तसंच भारताच्या महान लोकशाहीवर विश्वास ठेवा, कामगिरीच्या राजकारणावर विश्वास ठेवा, स्थिरतेच्या निर्धारावर विश्वास ठेवा, एक भारत-सर्वोत्तम भारताच्या भावनेवर विश्वास ठेवा,'' असं नरेंद्र मोदी कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हटलं आहे.

## पुदुच्चेरीत पुन्हा एनडीएचीच सत्ता, एन. रंगस्वामी सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होणार

पुदुच्चेरी : पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या ३० जागा असलेल्या विधानसभेसाठी एकाच टप्प्यात ८१ टक्के मतदान झाले. या राज्यात सध्या एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वात भाजपची युती सत्तेत आहे. विधानसभेच्या निवडणुकीत जनतेचा कौल पुन्हा एकदा याच युतीला मिळताना दिसत आहे.पुदुच्चेरीत ऑल इंडिया एनआर काँग्रेस सहा जागांवर जिंकली असून तीन जागांवर आघाडी आहे. भाजप एका जागेवर जिंकली असून एका जागेवर आघाडीवर आहे. यामुळे एआयएनआरसी आणि भाजप युती ११ जागांवर विजयी वा आघाडीवर असल्याचे दिसत आहे. या व्यतिरिक्त एक अपक्ष विजयी झाला असून दोन अपक्ष आघाडीवर आहेत. काँग्रेस एका जागेवर विजयी झाली आहे. एडीएमके एका जागेवर जिंकली आहे.

आतापर्यंत ज्या १६ जागांचे निकाल हाती आले आहेत त्यात सत्ताधारी युती आघाडीवर दिसत आहे. यामुळे मुख्यमंत्री एन. रंगास्वामी पुन्हा एकदा सत्तेत येण्याची चिन्हं दिसत आहेत.

## लातूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबाबत आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सन २०१६ ते २०२० या वित्तीय वर्षात प्रवेशित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम समाज कल्याण विभागाकडून मंजूर झाली आहे. परंतु, संबंधित प्रशिक्षणार्थ्यांचे बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड आणि मोबाईल क्रमांक उपलब्ध नसल्याने शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा होऊ शकलेली नाही.

तरी सन २०१६ ते २०२० या कालावधीतील पात्र विद्यार्थ्यांनी आपले सध्या सुरू असलेले बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड, मोबाईल क्रमांक, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि ओळखीचा इतर पुरावा घेऊन २० मे २०२६ पर्यंत संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहावे व आपली शिष्यवृत्तीची रक्कम रोखा विभागाकडून प्राप्त करून घ्यावी. जे विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाहीत, त्यांनी आपले सर्व आवश्यक कागदपत्रे संस्थेच्या latur_iti@yahoo.com या ईमेलवर पाठवावीत. विहित मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास शिष्यवृत्तीची रक्कम वाटप न करता ती शासनास जमा केली जाईल, असे लातूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संजय माळकुंजे यांनी कळविले आहे.

# प. बंगालमध्ये भाजपाचा ऐतिहासिक विजय!

**मुंबई/प्रतिनिधी :** २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल हे केवळ राजकीय परिवर्तन नसून, आधुनिक निवडणूक रणनीतीचे एक ठळक उदाहरण ठरले आहे. या निवडणुकीत भाजपने प्रचंड यश मिळवत टीएमसीच्या दीर्घकालीन सत्तेला मोठा धक्का दिला आहे. या विजयामागे केवळ सभांचा प्रभाव नसून, कोलकाता आणि दिल्लीतील अत्याधुनिक 'वॉर रूम' रणनीती निर्णायक ठरल्याचे समोर आले आहे.

भाजपच्या या संपूर्ण निवडणूक मोहिमेचे केंद्रबिंदू केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची 'बूथ पातळीवर विजय' ही संकल्पना होती. त्यांनी बंगालमध्ये प्रत्यक्ष उपस्थिती ठेवत संघटनात्मक रचनेवर काटेकोर लक्ष दिले. दिल्ली



आणि कोलकाता येथील वॉर रूममध्ये २४ तास डेटा विश्लेषण करून प्रत्येक बूथचा फीडबॅक थेट नेतृत्वापर्यंत पोहोचवला जात होता.

या मोहिमेत भाजपचे प्रमुख रणनीतीकार भूपेंद्र यादव यांनी 'पन्ना प्रमुख' मॉडेल राबवत स्थानिक पातळीवर पक्षाची पकड मजबूत केली. तर सुनील बन्सल यांनी टीएमसीविरोधी असंतोष असलेल्या मतदारांवर लक्ष केंद्रित करून सूक्ष्म स्तरावर प्रचाराची आखणी केली.

उद्योग आणि सीमावर्ती भागांवर धर्मेंद्र प्रधान यांनी रणनीती आखली, तर डॉ. महेश शर्मा यांनी शहरी आणि मध्यमवर्गीय मतदारांमध्ये पक्षाची प्रतिमा मजबूत करण्यावर भर दिला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी घुसखोरी आणि नागरिकत्व यांसारख्या मुद्द्यांवर आक्रमक प्रचार करत राजकीय वातावरण अधिक तीव्र केले.

टीएमसीचा प्रभाव कमी करण्यासाठी भाजपने केवळ पारंपरिक मतपेढीवरच नव्हे, तर महिला मतदार आणि असंतुष्ट घटकांवरही विशेष लक्ष दिले. संदेशखालीसारख्या मुद्द्यांचा निवडणूक प्रचारात प्रभावी वापर करण्यात आला. तसेच ग्रामीण भागात शुभेंदू अधिकारी यांनी स्थानिक पातळीवर जनसंपर्क वाढवून मतदारांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न केला.

या संपूर्ण रणनीतीमुळे टीएमसीची पारंपरिक ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे चित्र दिसत आहे. डिजिटल डेटा, सूक्ष्म व्यवस्थापन आणि स्थानिक स्तरावरील संघटन या तिन्ही घटकांचा प्रभावी संगम भाजपच्या विजयामागे निर्णायक ठरला आहे.

## बारामतीत सुनेत्रा पवारांचा ऐतिहासिक विजय; देशातील सर्वात मोठ्या मताधिक्याचा विक्रम

**बारामती/प्रतिनिधी :** आसाम, केरळ, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगाल या ५ राज्यांसोबत महाराष्ट्रातील राहुरी आणि बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीचे निकाल देखील आज जाहीर झाले. बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी दणदणीत विजय मिळवला आहे. तर राहुरीत भाजपाच्या अक्षय कर्डीले यांनी विजय मिळवला आहे. बारामतीत सुनेत्रा पवारांचा ऐतिहासिक विजय : बारामती पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अभूतपूर्व कामगिरी करत मोठा विजय मिळवला आहे. मतमोजणीच्या २४ व्या फेरीअखेर त्यांनी तब्बल २ लाख १८ हजार ९३० मतांची आघाडी घेतली, जी देशातील सर्वाधिक मताधिक्यांपैकी एक मानली जात आहे. प्रत्येक फेरीत त्यांची आघाडी वाढत गेल्यानं



प्रतिस्पर्ध्यांना मोठा धक्का बसला.

२४ व्या फेरीअखेर २,१८,९३० मतांनी आघाडी : या विजयामुळं उत्तर प्रदेशातील साहिबाबाद मतदारसंघातील आमदार सुनील कुमार शर्मा यांनी २०२२ मध्ये केलेला २ लाख १४ हजार ८३५ मताधिक्याचा विक्रम मागे पडल्याचा दावा केला जात आहे. बारामतीतील निकालाने हा आकडा ओलांडत नवा विक्रम प्रस्थापित केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

बारामती परिसरात उत्साहाचं वातावरण या निकालानंतर बारामती परिसरात उत्साहाचं वातावरण निर्माण झालं असून समर्थकांनी जल्लोष साजरा केला. विजय मिळाल्यानंतर जय पवार आणि कार्यकर्त्यांनी अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन अभिवादन केलं.

सुनेत्रा पवार यांची ऐतिहासिक कामगिरी : या विजयानंतर राज्य आणि देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या विक्रमाबाबत अधिकृत पुष्टी निवडणूक आयोगाच्या अंतिम आकडेवारीनंतर होणार असली तरी, सध्याच्या घडीला सुनेत्रा पवार यांची ही कामगिरी ऐतिहासिक मानली जात आहे.

## निवडणूक निकालांपूर्वी दिलासा! पेट्रोल-डिझेल दर अद्याप स्थिर

**मुंबई/प्रतिनिधी** :सोमवार ४ मे रोजी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना पेट्रोल आणि डिझेलच्या दरांबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. सध्या तरी तेल कंपन्यांनी इंधन दरात कोणताही बदल केलेला नाही, त्यामुळे वाहनधारकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. म्हणजेच, आज पेट्रोल-डिझेल भरणाऱ्यांना जुन्याच दराने पैसे मोजावे लागणार आहेत.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती मात्र वाढताना दिसत आहेत. ब्रेंट क्रूड सुमारे १०८.३० डॉलर प्रति बॅरलवर स्थिर आहे, तर यूएस क्रूड १०२ डॉलरच्या आसपास व्यवहार करत आहे. या वाढत्या दरांचा परिणाम देशांतर्गत इंधन दरांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत प्रति लिटर ४ ते ५ रुपयांनी वाढ होऊ शकते. एलपीजी सिलेंडरही महाग होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून किरकोळ दर स्थिर ठेवले असले तरी, वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतीमुळे तेल कंपन्यांवर आर्थिक ताण वाढत असल्याचे सांगितले जात आहे.

तथापि, सरकारकडून अद्याप दरवाढीबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की सध्या दरांमध्ये कोणताही बदल झालेला नाही आणि देशात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

## कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या पंप चालकांवर होणार कारवाई !

### प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मीना यांनी घेतला आढावा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यामध्ये पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही, काही पेट्रोल पंप चालकांकडून विनाकारण पंप बंद ठेवले जात असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. ग्राहकांना इंधन नाकारून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा हा प्रकार सार्वजनिक हिताला बाधा आणणारा असून, याची गंभीर दखल घेत प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मिना यांनी जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांसाठी नियमावली जाहीर केली आहे. त्यांनी जिल्ह्यातील पेट्रोलपंप धारकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेवून याबाबत सूचना दिल्या आहेत.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्यासह पेट्रोलपंप चालक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पेट्रोलपंप चालकांनी साठा उपलब्ध असताना कोणत्याही परिस्थितीत विक्री बंद ठेवू नये. तसेच ग्राहकांना इंधन देण्यास कोणत्याही परिस्थितीत नकार देऊ नये. इंधनाची मर्यादित विक्री करणे किंवा कारणाशिवाय अडथळे निर्माण करणे टाळावे. शासनाने ठरवून दिलेल्या विहित वेळेत पंप नियमित सुरू ठेवावेत. पंपावर दर्शनी भागात इंधनाचे दर स्पष्टपणे दिसतील असे फलक लावावेत. स्टॉक आणि विक्रीची नोंद रोजच्या रोज अपडेट असावी आणि तपासणी अधिकाऱ्यांना सर्व नोंदवह्या उपलब्ध करून द्याव्यात. साठा लपविणे किंवा मुद्दाम टंचाई निर्माण करणे हे नियमांचे उल्लंघन मानले जाईल. पंपावर सीसीटीव्ही प्रणाली २४ तास कार्यरत असावी आणि त्याचे रेकॉर्ड प्रशासनास उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना सर्व पेट्रोलपंप चालकांना यावेळी देण्यात आल्या.

तालुकास्तरावर विशेष पथके स्थापन

यानुसार अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर विशेष पथके गठीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी, सहायक पथक प्रमुख म्हणून संबंधित पुरवठा निरीक्षक किंवा सहायक महसूल अधिकारी आणि सदस्य



म्हणून संबंधित पुरवठा विभागाचे लिपिक-टंकलेखक यांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके आपापल्या कार्यक्षेत्रातील पेट्रोल पंपांची अचानक तपासणी करतील.

तपासणी दरम्यान जर एखादा पेट्रोल पंप चालक दोषी आढळला, तर त्यांच्यावर केवळ आर्थिक दंडच नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये पेट्रोलियम नियम २००२, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, भारतीय नागरिक सुरक्षा २०२३ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदींनुसार कडक कारवाई केली जाईल. या आदेशाची प्रत सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आली आहे. जिल्ह्यातील तेल कंपन्यांच्या सेल्स ऑफिसर्सनाही या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून देण्यात आली.

# २.१७ लाखांचा मुद्देमाल जप्त; ५ जण ताब्यात

## भांबरी शिवारात जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात सुरू ठेवलेल्या कठोर मोहिम अंतर्गत दिनांक ३ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील भांबरी शिवारात धाड टाकत ''तिर्रट'' नावाच्या जुगार अड्ड्यावर कारवाई करत पाच जणांना रंगेहात पकडले असून, तब्बल ₹२,१७,०६०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ०३ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे १७:१० वाजण्याच्या सुमारास, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये व अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वातील पथकाने भांबरी शिवारातील एका शेतात नारळाच्या झाडाखाली बेकायदेशीर जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाले वरून माहितीची शहानिशा करून सायं. १७:४० वाजता संबंधित ठिकाणी धाड टाकण्यात आली. छाप्यात पाच इसम गोलाकार बसून ''तिर्रट'' नावाचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्वरित सर्वांना ताब्यात घेत पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, मोबाईल हँडसेट, जुगाराचे साहित्य, मोबाईल, वाहन असा एकूण ₹२,१७,०६०/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या कारवाईत खालील आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

१) शाबाज हमीद शेख (रा. वसवाडी पाखरसांगवी, लातूर)
२) इंजमाम भुरेखा पठाण (रा. जाफर नगर, लातूर)
३) सागर जयद्रथ जाधव (रा. खाडगाव रोड, लातूर)
४) अविनाश आनासाहेब बनसोडे (रा. पटेल नगर, लातूर)
५) आसिफ अय्युब उमाटे (रा. खाडगाव रोड, लातूर)

वरील सर्व आरोपी हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या



तिर्रट जुगार खेळत व खेळवत असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) अन्वये पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली पथकामधील पोउपनि अमर केंद्रे, पोलीस अंमलदार, साहेबराव हाके,अर्जुनसिंग राजपूत, रियाज सौदागर, मनोज खोसे, आनंद हल्लाळे, प्रविण कोळसुरे यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यातील कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, जुगार, सट्टा, मटका यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. अशा कारवाया भविष्यातही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

संपादकीय...

## पर्यायी इंधनाचा शोध घेणे अनिवार्य...

मध्यपूर्वेतील संघर्ष चिघळला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा अडकली आहे. अमेरिका पुन्हा इराणवर हल्ला करण्याची सज्जता करीत आहे. इराणनेही बदला घेण्याचा इशारा दिला आहे. अशा अस्थिर वातावरणात कच्च्या इंधन तेलाचे दर प्रतिबॅरल १२५ डॉलरची मर्यादा पार करुन गेले आहेत. भारतात कच्चे तेल फारसे सापडत नसल्याने आपण ९० टक्के आयातीवर अवलंबून आहोत. प्रत्येक वर्षी आपल्याला जवळपास २०० कोटी बॅरल तेल लागते. त्याच्यापैकी १८० कोटी बॅरल तेल आयात करावे लागते. हा खर्च जवळपास १५ लाख कोटी रुपयांचा आहे. तेलदर असेच वाढत चालल्यास भारतात महागाईचा भडका उडणार हे निश्चित. त्यामुळे त्वरेने आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याची आवश्यकता आहे. यासाठी पर्यायी इंधनाचा शोध घेणे अनिवार्य झाले आहे. हा प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. इंधन तेलापासून निर्माण होणारे पेट्रोल आणि डिझेल यांच्यावरच देशातील बव्हंशी वाहतूक अवलंबून आहे. तेलाला सोयीचा आणि व्यवहारी पर्याय अद्याप सापडलेला नाही. मात्र, प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे. सध्या आपल्या देशात अनेक पर्यायांवर संशोधन केले जात आहे. सौरऊर्जा, अणुऊर्जा, जैविक इंधन, जलऊर्जा, वायूऊर्जा अशा अनेक पर्यायांवर विचार करण्यात येत आहे. बिगर खनिज ऊर्जानिर्मितीची क्षमता ४८४.८२ गीगा वॅटस् पर्यंत वाढविण्याचे भारताचे ध्येय आहे. या ध्येयाच्या निम्मी क्षमता २०३० पर्यंत निर्माण करण्याचे आपले उद्दिष्ट होते. आनंदाची बाब अशी की, हे उद्दिष्ट आपल्या देशाने निर्धारीत कालावधीच्या पाच वर्षे आधी, अर्थात २०२५ मध्येच साध्य केले आहे. सध्या भारताची बिगर खनिज ऊर्जा निर्मितीची क्षमता (इन्स्टॉल्ड कॅपॅसिटी) २४२.७८ गीगावॅटची असल्याचे घोषित करण्यात आले आहे. या संदर्भात प्रगती होत असली, तरी वीज हा आजही तेलाला पर्याय होऊ शकत नाही. कारण वीजेवर चालणारी वाहने कमी आहेत. खनिज तेलाला पर्याय म्हणून इथेनॉलचा उपयोग वाढविण्यावर भर दिला जात आहे. केंद्रीय मार्ग परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात ८५ टक्के इथेनॉलयुक्त इंधन उपलब्ध करुन देण्याचे प्रतिपादन केले आहे. इथेनॉल किंवा मद्यार्काचे मिश्रण सध्या पेट्रोलमध्ये २० टक्के इतक्या प्रमाणात केले जात आहे. त्यामुळे देशाचे जवळपास पावणेदोन लाख कोटी रुपये वाचतात. इथेनॉलची निर्मिती ऊसापासून साखर निर्माण होत असताना सहउत्पादन किंवा उपोत्पादन (बाय प्रॉडक्ट) म्हणून होते. उसापासून साखर निर्मिती न करता थेट इथेनॉलचे उत्पादनही केले जाऊ शकते. हे उत्पादन देशातच होत असल्याने आयातीवर अवलंबून राहण्याची फारशी आवश्यकता नसते. त्यामुळे इथेनॉल हाच खनिज तेलाला त्यातल्यात्यात सोयीचा पर्याय असल्याचे दिसून येते. ब्राझील या देशात (जिथे उसाचे उत्पादन सर्वाधिक आहे) ८५ टक्के इथेनॉलवर मोटारी चालविण्याचा प्रयोग यशस्वी झाल्याचे दिसून येते. मात्र, या साठी वाहनाच्या इंजिनात सुधारणा करावी लागते, असेही बोलले जाते. इंधनात जास्तीत जास्त इथेनॉलचे मिश्रण करुन वाहने चालविणे शक्य असेल, तर तो पर्याय भारतासाठी केवळ सोयीचा नव्हे, तर अनिवार्य आहे, असे म्हणावे लागते. त्यामुळे केंद्र सरकारने लवकरात लवकर त्यासंबंधी आवश्यक ती पावले उचलली पाहिजेत. महागाईवर नियंत्रण मिळवायचे असेल, तर इंधन आणि ऊर्जेची आवश्यकता अधिकतर प्रमाणात स्वदेशी पद्धतीने कशी पूर्ण करता येईल, हे पाहणे कर्तव्याचे आहे. यामुळे देशाचे बहुमोली परकीय चलन वाचेल आणि देशात रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणात होईल. अर्थातच, असा सोयीस्कर पर्याय निर्माण होऊन तो नागरिकांच्या पचनी पडण्यास अनेक वर्षे लागू शकतात. पण त्या दिशेने प्रयत्नच न केल्यास पुढच्या काळात इंधन अवलंबित्व आणखीनच वाढून आर्थिक परिस्थिती दोलायमान होऊ शकते. शिवाय, बिगरखनिज इंधने पर्यावरणाच्याही हिताची असतात, असे वैज्ञानिक म्हणतात. या इंधनांमुळे वायू प्रदूषण करणाऱ्या कार्बनचे उत्सर्जन कमी होते. या पर्यायांवर काम होत असतानाच देशात वीजेवर चालणारी वाहने कशी लोकप्रिय होतील हे पहावे लागेल. अशा वाहनांच्या उपयोगकर्त्यांना सध्या ज्या तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागते, त्या दूर करण्यासाठी तंत्रवैज्ञानिक उपाययोजनेवर संशोधन होणे आवश्यक आहे. पर्यावरणस्नेही वीजनिर्मिती करण्याच्या दिशेने भारताने नुकतेच कौतुकास्पद पाऊल टाकले आहे. अणुवीजनिर्मितीसाठी थोरियम या खनिजाचा उपयोग करण्याचे तंत्रज्ञान शोधण्यात भारताने यश मिळविले आहे. तामिळनाडूतील कल्पाक्कम अणुभट्टीत हा प्रयोगाचे दोन टप्पे यशस्वी झाले आहेत.

# पंढरपूर तीर्थक्षेत्राचा समग्र विकास येत्या ३० महिन्यांत पूर्ण करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### पंढरपूर तीथक्षेत्र विकासासाठी ४१५०.४६ कोटीच्या विकास आराखड्यास शिखर समितीच्या बैठकीत मान्यता




**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पंढरपूर तीथक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत ४१५०.४६ कोटीच्या सर्वसमावेशक आराखड्यास मान्यता देण्यात आली. पंढरपूर हे राज्यातील सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकास आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात. पुढील ५० वर्षाचा विचार करुन या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकास कामे येत्या ३० महिन्यात पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वने मंत्री गणेश नाईक, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान अवताडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक तीर्थक्षेत्र आहे. येथे दरवर्षी आषाढी, कार्तिकी, चैत्री आणि माघी वारीच्या काळात लाखो वारकरी श्री विठ्ठल-रुक्मिणींच्या दर्शनासाठी येतात. भाविकांची सातत्याने वाढणारी संख्या, रस्ते, वाहतूक आणि अन्य संबंधित बाबी लक्षात घेता पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसराच्या समग्र व नियोजित विकासाची कामे वेगाने हाती घेण्यात यावीत.

पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी व भाविकांना स्वच्छ, गर्दीमुक्त, सुरक्षित आणि आध्यात्मिकदृष्ट्या समाधानकारक अनुभव मिळावा हा विचार करून विकास कामे दर्जेदार, शाश्वत व भविष्याभिमुख पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. यासाठी बाधित निवासी व व्यावसायिक मालमत्ताधारक तसेच भाडेकरूंना योग्य मोबदला तात्काळ देण्यात यावा. भूसंपादनासाठी आवश्यक निधीही त्वरित उपलब्ध करून द्यावा आणि निधीअभावी कोणतेही काम अपूर्ण राहू नये, अशा सूचनाही मुख्यमंत्री यांनी यावेळी दिल्या.

सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार गर्दी व्यवस्थापनासाठी कॉरिडॉर उभारणी, पुरातन मंदिर व मठांचे जतन-संवर्धन, बाधितांना व्यावसायिक संधी आणि वारकऱ्यांसाठी समग्र सुविधा विकास यासाठी ७३५.८० कोटी रुपयांचा आराखडा मांडण्यात आला. तसेच नगर प्रदक्षिणा मार्ग विकास, नदी घाट सुशोभीकरण, वाहनतळ व व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, रस्ते व पूल आणि पालखी तळांच्या विकासासाठी १३८७.९१ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. याशिवाय भूसंपादन व पुनर्वसन खर्च, बाधित इमारतींचा मोबदला आदींसाठी २०२६.७५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मांडण्यात आला. असा एकूण ४१५०.४६ कोटी रुपयांच्या या सर्वसमावेशक आराखड्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी आजच्या शिखर समितीच्या बैठकीत मान्यता दिली.

# मुलीचं लग्न लागल्याबरोबर इंदुरीकरांचे ट्रोलर्सना सडेतोड उत्तर म्हणाले, ज्याची परिस्थिती...



**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांची कन्या ज्ञानेश्वरी यांचा विवाह सोहळा ३ मे रोजी संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथे अत्यंत शाही थाटात पार पडला. साखरपुड्यापासूनच हा विवाह सोहळा चर्चेत होता. अतिशय भव्यदिव्य पद्धतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावरून इंदुरीकर महाराजांवर टीका देखील करण्यात आली. पण आपल्या परखड भाष्यामुळे प्रसिद्ध असलेले इंदुरीकर महाराज यांनी यावेळी ही आपल्या शैलीमध्ये ट्रोलर्संना सडेतोड उत्तर दिलंय.

प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराज यांची मुलगी ज्ञानेश्वरी हिचा ३ मे रोजी विवाह संपन्न झाला. ज्ञानेश्वरी हिचा विवाह उद्योजक सुनील विष्णू चिलप यांचे सुपुत्र साहिल यांच्याशी झाला. या विवाह सोहळ्यासाठी गुंजाळवाडी येथे तब्बल १० एकर क्षेत्रात भव्य दिव्य मंडप उभारण्यात आला होता. सुमारे ३ लाख लोकांसाठी भोजन आणि बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या शाही सोहळ्याला राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री छगन भुजबळ, आमदार सत्यजित तांबे, विवेक कोल्हे यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि वारकरी संप्रदायातील अनेक दिग्गज उपस्थित होते.

दरम्यान, ज्यावेळी ज्ञानेश्वरी हिचा साखरपुडा झाला होता, त्यावेळी इंदुरीकर महाराजांवर मोठ्या प्रमाणात टीका सहन करावी लागली होती. आता मुलीचा विवाहसोहळा संपन्न झाल्यानंतर इंदुरीकर महाराजांनी लग्नात भाषण करत टीकाकारांना प्रत्युत्तर दिले आहे.

इंदुरीकरांचे ट्रोलर्सना सडेतोड उत्तर


''साखरपुड्याची चर्चा जशी महिनाभर चालली तशी ही चर्चा एक वर्षभर आरामशीर चालेल. बऱ्याच लोकांची जी शंका आहे की इंदोरीकर महाराजांनी मुलीचं लग्न एवढं मोठं का केलं? इंदोरीकर महाराज लोकांना सांगतात की लग्न साधेपणाने करा आणि स्वत: मुलीचं लग्न मोठं केलं तर त्याचं उत्तर असं आहे की ज्याची परिस्थिती आहे, ज्याला संतांनी दिलंय, ज्याच्यावर ज्ञानोबारायाची कृपा आहे, त्यानं जरूर करावं. दुसरी शंका लोकांना मठ्ठ्याबाबत होती, कारण मी मठ्ठ्यावर बोलतो, तर मठ्ठा मी माझ्या सर्व कार्यक्रमातून वजा केला. त्याबाबत तुम्हाला बोलण्याचे अधिकार नाहीत''. पाहुण्यांसाठी पारंपरिक, सात्विक जेवणाची (गुलाबजाम आणि मठ्ठा यांसारख्या काही मिठाईशिवाय) व्यवस्था केली होती, असंही इंदुरीकर महाराज म्हणाले.

९० टक्के खर्च भक्तमंडळाने केला- इंदुरीकर महाराज

लग्नात मी मठ्ठा , गुलाबजाम केले नाही. लग्नामध्ये मराठमोळं आणि सात्विक जेवन होतं. आज मुलगा, मुलगी मोठी झाले ते दिसत आहे. मी किर्तनासाठी फिरत असल्याने त्यांची भेट होत नव्हती, माझी आणि माझ्या मुलाची देखील तीन वर्षे झाले भेट नाही. मी विद्यालय चालवतो, एक रुपया घेत नाही. शाळेत १३ शिक्षक आहेत, लग्नानंतर आता प्रश्न विचारला जाईल एवढा पैसा कुठून आला? माझ्या भक्तमंडळाने ९० टक्के खर्च केला. देणाऱ्याने दिला, त्यामुळे ट्रोल करण्याचा कोणाला अधिकार नाही, असं इंदुरीकर महाराजांनी सांगितले.

एक हटयुग आणि ज्ञानयोग...असे दोन योग...नास्तिक लोक त्यांचा मुळ स्वभाव सोडत नाही. आनंदाने, सामुहिकतेने आणि सात्विक विचारांनी झालेला हा विवाह आहे. टीका करणाऱ्यांनी नकारात्मकतेपेक्षा चांगल्या गोष्टीवर लक्ष घ्यावं, असं इंदुरीकर महाराज म्हणाले.

# विज्ञान आणि काव्य यांचा सुंदर संगम : 'नभ नवलाई'




समीक्षण : प्राचार्य डॉ. बालाजी लाहोरकर

मराठी विज्ञानसाहित्यात बालकिशोर वाचकांसाठी काव्यरूपातून विज्ञान मांडण्याचे प्रयत्न अत्यंत विरळ आढळतात; अशा पार्श्वभूमीवर प्रा. देवबा शिवाजी पाटील यांचा आभाळाचे गुपित हा पहिला काव्यसंग्रह आणि त्यानंतर आलेला 'नभ नवलाई' हा संग्रह मराठी विज्ञानकवितेच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण, अभिनव आणि दिशादर्शक टप्पा ठरतो. या दोन्ही काव्यसंग्रहांचे एकत्रित रसग्रहण करताना प्रथम लक्षात येते ती कवीची स्पष्ट व ठाम भूमिका विज्ञानाचे सुलभीकरण करून ते बालकिशोरांच्या मनापर्यंत पोहोचवणे, त्यांच्या जिज्ञासेला चालना देणे आणि विज्ञानाबद्दलची भीती दूर करून त्यात आनंदाची अनुभूती निर्माण करणे. ही भूमिका केवळ प्रस्तावना किंवा मनोगतात मर्यादित न राहता, प्रत्येक कवितेतून प्रभावीपणे साकार झालेली दिसते. 'नभ नवलाई' ही शीर्षक कविता संपूर्ण काव्यसंग्रहाचा भावार्थ उलगडणारी ठरते. आकाशातील तारे, आकाशगंगा, सूर्यमाला, ग्रह-उपग्रह यांचे अत्यंत सोप्या आणि लयबद्ध भाषेत केलेले वर्णन वाचकाला विश्वाच्या अथांगतेची जाणीव करून देते. ''आपल्या सूर्यमालेत नवग्रहांचा मेळा'' ही ओळ केवळ माहिती देत नाही, तर बालमनात एक जिवंत प्रतिमा उभी करते. हीच या काव्यसंग्रहाची खासियत आहेविज्ञान केवळ सांगितले जात नाही, तर ते अनुभवायला लावले जाते. 'सूर्य' या कवितेत कवीने सूर्यमालेच्या निर्मितीची संकल्पना ''वायुरूपी तप्त ताऱ्याच्या स्फोटातून'' या प्रतिमेतून मांडली आहे. सूर्य हा उष्णतेचा आणि ऊर्जेचा स्रोत आहे, तसेच सजीवसृष्टीचा आधार आहे, ही जाणीव अत्यंत सोप्या शब्दांत दिली आहे. 'पृथ्वी' या कवितेत ''कालांतराने ती थंड झाली'' या ओळींतून पृथ्वीच्या उत्क्रांतीचा प्रवास स्पष्ट होतो, तर ''जिच्यावर सारे सजीव जगती'' या विधानातून तिचे जीवनदायी महत्त्व अधोरेखित होते. 'चंद्र' या कवितेत ''सूर्यप्रकाशाचे करती परावर्तन'' या ओळींतून चंद्राच्या परप्रकाशित स्वरूपाचे स्पष्टीकरण दिले आहे, तसेच त्याच्या कलांचे काव्यमय चित्रण केले आहे. 'दिवस-रात्र' या कवितेत पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे दिवस-रात्र कसे होतात, ही संकल्पना अत्यंत सोप्या भाषेत मांडली आहे. ''थोडा थोडा भाग सूर्याकडे येतो'' या प्रतिमेतून पृथ्वीच्या गतीचे सजीव चित्र उभे राहते. 'पौर्णिमा-अमावस्या' आणि 'चंद्रकला' या कवितांमधून चंद्राच्या विविध अवस्थांचे वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले आहे. ''दररोज बदलती प्रकाशाचा कोन'' ही ओळ चंद्राच्या कलांमागील मूलभूत कारण सहजपणे स्पष्ट करते. यामुळे विद्यार्थ्यांना अवघड वाटणाऱ्या संकल्पना अगदी सहज समजतात. 'चंद्राचे खळे' या कवितेत प्रकाशविज्ञानाचा संदर्भ येतो. ''सूर्यप्रकाशात रंग सात'' या विधानातून वर्णपटाची ओळख करून देताना, हिमस्फटिकांमधून होणाऱ्या प्रकाशविभाजनाचे काव्यमय चित्रण केले आहे. ही कविता विज्ञानाच्या विविध शाखांचा परस्परसंबंध दाखवते. 'ग्रहण' या कवितेत ''सूर्य, पृथ्वी, चंद्र येता एका रेषेत'' ही ओळ ग्रहणाच्या घटनेचे मूलभूत तत्त्व स्पष्ट करते. त्यानंतर 'चंद्रग्रहण' आणि 'सूर्यग्रहण' या कवितांमध्ये या संकल्पनांचा विस्तार होतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील गैरसमज दूर होतात. वातावरणीय विज्ञानाशी संबंधित कवितांमध्ये कवीची निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलता अधिक प्रभावीपणे दिसून येते. 'ढग' या कवितेत बाष्पाचे ढगांमध्ये रूपांतर, 'पाऊस' या कवितेत पर्जन्यचक्र, 'गारांचा पाऊस' या कवितेत बर्फकणांची निर्मिती, तर 'ढगफुटी' या कवितेत नैसर्गिक आपत्तीचे स्वरूप स्पष्ट केले आहे. 'विजेचा चमचमाट' आणि 'ढगांचा गडगडाट' या कवितांमधून विद्युत् आणि ध्वनी या नैसर्गिक घटनांचे सुलभ स्पष्टीकरण मिळते. 'आभाळाचे रंग' आणि 'ढगांचे रंग' या कवितांमध्ये प्रकाशाचे विकिरण आणि अपवर्तन यांसारख्या संकल्पना अप्रत्यक्षपणे मांडल्या आहेत. 'इंद्रधनुष्याचे तोरण' या कवितेत सप्तरंगांचे काव्यमय दर्शन घडते. या सर्व कवितांमधून विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात दिसणाऱ्या घटनांमागील विज्ञान समजते आणि त्यांच्यात निरीक्षणाची सवय विकसित होते. 'चांदण्यांचे चालणे' आणि 'फिरते तारे' या कवितांमधून आकाशातील हालचालींचे सौंदर्य आणि त्यामागील वैज्ञानिक कारणे उलगडतात. या कविता विद्यार्थ्यांना केवळ माहिती देत नाहीत, तर त्यांना आकाशाकडे पाहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतः निरीक्षण करण्याची प्रेरणा देतात. ही प्रेरणाच विज्ञानाच्या शिक्षणातील सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. या सर्व कवितांचा एकत्रित विचार केला असता, कवीने विषयांची मांडणी अत्यंत सुबोध आणि क्रमबद्ध पद्धतीने केली आहे. सुरुवातीला खगोलशास्त्रातील मूलभूत संकल्पना, त्यानंतर चंद्राच्या अवस्थांचे स्पष्टीकरण, पुढे ग्रहणासारख्या गुंतागुंतीच्या घटना आणि शेवटी वातावरणीय विज्ञानाशी संबंधित विविध प्रक्रिया अशा टप्प्याटप्प्याने विषयांचा विस्तार होत जातो. त्यामुळे हा काव्यसंग्रह विद्यार्थ्यांसाठी एक प्रकारचा काव्यमय विज्ञानप्रवास ठरतो. भाषाशैली हा या काव्यसंग्रहाचा सर्वात मोठा बलस्थान आहे. कवीने अत्यंत साधी, सरळ आणि लयबद्ध भाषा वापरली आहे. कोणतीही क्लिष्ट वैज्ञानिक शब्दावली न वापरता, दैनंदिन जीवनाशी निगडित प्रतिमा आणि उदाहरणे वापरून संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. त्यामुळे कविता सहज समजतात, लक्षात राहतात आणि वाचनात आनंद देतात. काव्यरूपामुळे विज्ञान शिकण्याची प्रक्रिया आनंददायी बनते, ही या काव्यसंग्रहाची मोठी जमेची बाजू आहे. शैक्षणिक दृष्टिकोनातून पाहता, हा काव्यसंग्रह अत्यंत उपयुक्त आहे. शिक्षकांसाठी तो अध्यापन अधिक रंजक आणि प्रभावी बनवणारे साधन आहे, तर पालकांसाठी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांसाठी तो ज्ञान, कुतूहल आणि आनंद यांचा सुंदर संगम आहे. विशेषतः ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमधील आकलनातील तफावत लक्षात घेऊन कवीने केलेली सुलभ मांडणी कौतुकास्पद आहे. एकूणच, प्रा. देवबा पाटील यांचे 'आभाळाचे गुपित' आणि 'नभ नवलाई' हे काव्यसंग्रह मराठी विज्ञानसाहित्यातील एक महत्त्वपूर्ण, सर्जनशील आणि विद्यार्थ्योपयोगी योगदान म्हणून ओळखले जावे लागेल. या काव्यसंग्रहांमधून विज्ञान केवळ शिकवले जात नाही, तर ते अनुभवायला लावले जाते, समजायला सोपे केले जाते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते आवडायला लावले जाते. म्हणूनच हे काव्यसंग्रह बालकिशोर वाचकांच्या मनात विज्ञानाची गोडी निर्माण करणारे, त्यांच्या जिज्ञासेला चालना देणारे आणि शिक्षणाला आनंददायी बनवणारे एक उत्कृष्ट साहित्यप्रयोग ठरतात.

## संक्षिप्त...

### पंढरपूर कॉरिडॉरला अखेर मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी** : वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण 'पंढरपूर कॉरिडॉर' आणि विकास आराखड्याला सोमवारी राज्य मंत्रिमंडळाच्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडलेल्या या बैठकीत सुमारे चार हजार कोटी रुपयांच्या या विस्तृत आराखड्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून, या निर्णयामुळे पंढरपूर शहराच्या सर्वांगीण विकासाचा आणि मंदिर परिसराच्या विस्ताराचा मार्ग मोकळा झाला आहे.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार समाधान आवताडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता, भविष्यातील गर्दीचे नियोजन करणे आणि दुर्घटना टाळणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या काळात पंढरपुरात दाखल होणारी भाविकांची मोठी संख्या पाहता, मंदिर परिसरात सुसज्ज मार्ग व पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या 'ड्रीम प्रोजेक्ट' (महत्त्वाकांक्षी प्रकल्प) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विकास आराखड्यांतर्गत भूसंपादनाची प्रक्रिया १ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत. मागील आषाढी एकादशीला कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सुमारे २८ लाख भाविक पंढरपुरात दाखल झाल्याची नोंद झाली होती. त्यामुळे भाविकांना अधिक सुरक्षित व सहज दर्शन घेता यावे, यासाठी या कॉरिडॉरची आखणी करण्यात आली आहे.

व्यापाऱ्यांच्या आक्षेपांवर उपाय

या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात स्थानिक व्यापाऱ्यांकडून काहीसा विरोध दर्शवण्यात आला होता. कॉरिडॉरमुळे दुकानांचे स्थलांतर करावे लागेल, अशी भीती व्यापाऱ्यांमध्ये होती. मात्र, मुख्यमंत्र्यांनी सोलापूर दौऱ्यात व्यापाऱ्यांशी संवाद साधत, या प्रकल्पामुळे त्यांचा व्यवसाय अनेक पटींनी वाढेल, असा विश्वास दिला होता. त्यानंतर प्रशासनानेही व्यापाऱ्यांशी चर्चा करून त्यांची समजूत काढल्याने प्रकल्पातील मोठा अडथळा दूर झाला आहे.

### भोंदूबाबा अशोक खरातला शिर्डी पोलीस घेणार ताब्यात, विशेष पथक नाशिकला जाणार

**शिर्डी/प्रतिनिधी** : शिर्डीतील जमीन फसवणूक व खासगी सावकारी प्रकरणात अडकलेल्या भोंदू अशोक खरात याला शिर्डी पोलीस ताब्यात घेणार आहेत. सध्या तो नाशिक एसआयटीच्या ताब्यात असून कायदेशीर प्रक्रियेसाठी सोमवारी (४ मे) पोलिसांचं पथक नाशिकला रवाना होणार आहे.

वास्तविक, विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या भोंदू अशोक खरात याच्या ताब्यासाठी शिर्डी पोलिसांनी हालचाली वेगवान केल्या आहेत. त्यासाठी पोलिसांचं विशेष पथक नाशिककडे रवाना होणार आहे. शिर्डी पोलीस ठाण्याचे झएघब निवांत जाधव यांच्या नेतृत्वाखाली ४ जणांचं पथक नाशिकला जाणार असून, तेथील न्यायालयीन प्रक्रियेनंतर खरातचा ताबा मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

अशोक खरात सध्या नाशिक एघ्ऊ च्या ताब्यात : सध्या अशोक खरात हा बलात्काराच्या गुन्ह्यात नाशिक एघ्ऊ च्या ताब्यात असून त्याला आज नाशिक न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शिर्डी पोलिसांनी न्यायालयात आवश्यक पत्रव्यवहार सुरू केला असून पुढील तपासासाठी त्याचा ताबा मिळवण्याची मागणी केली जाणार आहे.

जमीन गैरव्यवहार प्रकरणी खरात आणि त्याच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल : दरम्यान, शिर्डीतील शेतकरी रावसाहेब गोंदकर यांची चार एकर जमीन सावकारकीच्या माध्यमातून बळकावल्याच्या प्रकरणी अशोक खरात व त्याची पत्नी कल्पना खरात यांच्याविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तसेच राहाता येथील समता पतसंस्थेमधील सुमारे १०० बोगस खात्यांच्या प्रकरणातही अशोक खरात याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या सर्व प्रकरणांचा सखोल तपास करण्यासाठी शिर्डी पोलिसांनी खरातचा ताबा मिळवणं आवश्यक असल्याचं सांगितलं आहे. आजच्या न्यायालयीन सुनावणीनंतर अशोक खरातचा ताबा शिर्डी पोलिसांना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच या प्रकरणातील फरार आरोपी कल्पना खरात हिच्या शोधासाठी पोलिसांनी विविध पथकं रवाना केली असून तिला लवकरच अटक होण्याची शक्यता आहे.

### पुण्यातील बलात्कार प्रकरणांवरुन राऊत संतापले, म्हणाले प्रत्येकवेळी एसआयटी नेमण्याची गरजच काय

**मुंबई/प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यात एका दिवसात भोर, चाकण आणि पिंपरी-चिंचवड परिसरात घडलेल्या तीन बलात्कारांच्या घटनांमुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नेमकी कोणत्या घटनेसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) नेमण्यात आले आहे, असा थेट सवाल करण्यात आला. तसंच गृहमंत्रालय या घटनांमध्ये अपयशी ठरले आहे का, असा मुद्दा आज खासदार संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला.

चार वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेचा उल्लेख करताना, कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेचे हे मोठे अपयश असल्याची टीका संजय राऊत यांनी केली. आरोपी आधीच पोलिसांच्या ताब्यात असताना एसआयटी नेमण्याची गरज काय, असा सवाल उपस्थित करत, प्रत्येक घटनेनंतर फक्त एसआयटी जाहीर करण्याची पद्धत चुकीची असल्याचं मत त्यांनी मांडलं. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि कायद्याचा धाक निर्माण होणे गरजेचं असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.चाकण, पिंपरी-चिंचवड तसंच नागपूरमध्ये घडलेल्या घटनांचा संदर्भ देत, सर्वत्र एसआयटी नेमणार का, असा प्रश्न त्यांनी विचारला. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषींना तात्काळ कठोर शिक्षा, अगदी फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी तीव्र भावना व्यक्त करत, पीडित मुलीच्या वडिलांच्या वेदनेचा उल्लेख राऊत यांनी केला.

# खेला हो गया! ममता बॅनर्जी यांचा पराभव

## भाजपाचे सुवेंदू अधिकारी यांचा १५,१०५ मतांनी विजय

कोलकाता- पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा भवानीपूर मतदारसंघात पराभव झाला आहे. भाजपाचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी त्यांचा १५,१०५ मतांच्या फरकानं पराभव केला. सकाळी मतमोजणी सुरू झाल्यापासूनच या दोन्ही उमेदवारांमध्ये आघाडी मिळवण्यासाठी चुरशीची लढत सुरू होती. अखेरच्या फेरीत सुवेंदू अधिकारी यांनी विजय मिळवला. भवानीपूर मतदारसंघात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाल्यानं तृणमुल पक्षाला मोठा धक्का बसला आहे.



भाजपाचे उमेदवार सुवेंदू अधिकारी यांनी भवानीपूर आणि नंदीग्राम या दोन विधानसभा जागांवर विजय मिळवून पश्चिम बंगालच्या राजकारणात दबदबा सिद्ध केला. भवानीपूरमधील मतमोजणीच्या २० व्या आणि अंतिम फेरीनंतर भारतीय निवडणूक आयोगानं निकाल जाहीर केला. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार अधिकारी यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा १५,१०५ मतांच्या मोठ्या फरकानं पराभव केला आहे. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरील दिलेल्या माहितीनुसार, १९ व्या आणि अंतिम फेरीच्या समाप्तीपर्यंत सुवेंदू अधिकारी यांना १,२७,३०१ मते मिळाली होती.

भवानीपूर मतदारसंघातील कल

१६ व्या फेरीत एका महत्त्वपूर्ण बदल जाणवत होते. या फेरीत भाजपाचे सुवेंदू अधिकारी यांनी ५३,९३२ मते मिळवली होती. ते मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यापेक्षा किंचित पुढे गेले. मतमोजणीच्या १६ फेऱ्यांनंतर निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार दोन्ही उमेदवारांमध्ये अटीतटीची लढत झाल्याचं दिसून आलं. बॅनर्जी ५३,३६९ मतांसह पिछाडीवर होत्या. तर चे उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर होते. यापूर्वी, १४ व्या फेरीच्या अखेरीस बॅनर्जी यांनी ३,८३० मतांची मोठी पिछाडी कमी केली होती. परंतु १७ व्या फेरीनं पुन्हा एकदा भाजपाचे उमेदावर सुवेंदू आघाडीवर आले. मुख्यमंत्री मतमोजणी केंद्रातून बाहेर पडत असताना भवानीपूर येथील तणावाची स्थिती होती. मतमोजणी केंद्राबाहेर भाजपा समर्थकांचा मोठा जमाव जमला होता. ''घोटाळेबाज ममता, दूर जा'' अशी घोषणाबाजी सुरू होती. लोकांमध्ये सत्ताविरोधी लाट दिसून आली.

# आरेमधील ६५ एकरवर वृक्ष लागवडीचे नियोजन करा – पालकमंत्री ॲड. आशिष शेलार

## आरे वसाहतीची मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्याकडून पाहणी



**मुंबई/प्रतिनिधी** : आरे वसाहतीमधील विविध प्राधिकरणाकडे असलेल्या ६५ एकर जागेवर येत्या पावसाळ्यात झाडे लावण्याचे नियोजन करा. तसेच आरे जंगलाची घनता वाढविण्यासाठीच्या उपाययोजनांबाबतही कृती आराखडा तयार करा, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम हाती घेण्यात येणार आहे. मुंबईचे वाढते तापमान लक्षात घेता, या योजनेत मुंबई उपनगराचा सहभाग वाढवण्यासाठी आरे वसाहतीची मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी पाहणी केली. या वसाहतीमध्ये जी शासकीय प्राधिकरणे व कार्यालये आहेत, त्यांच्या कार्यालयात जाऊन त्यांचे कामकाज समजून घेतले, त्यांना जिल्हा नियोजनातून काही मदत करता येईल का तसेच त्यांच्याकडे असलेल्या जागांपैकी मोकळी जागा आहे का? असल्यास किती वृक्ष लागवड करता येईल आदी आढावा घेण्यात आला.

या दौऱ्यात मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे अधिकारी, मुंबई महापालिका, एमएमआरडीए अशा संबंधित अधिकाऱ्यांना नोंदी करायला सांगून जिल्हाधिकाऱ्यांनी या जागेवर वृक्ष किती लागू शकतात, कोणते लावणे अपेक्षित आहे तसेच काही ठिकाणी मियावाकी जंगल वाढवता येईल का. आरे मधील जंगलाची घनता वाढविण्यासाठी काय करता येईल. याचे संपूर्ण नियोजन व कृती आराखडा सादर करा, असे निर्देश मंत्री ॲड. शेलार यांनी दिले.

या दौऱ्यात गोरेगाव पशुवैद्यकीय रुग्णालय, महानंद डेरीचे मुख्यालय, आरे वसाहतीमधील राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ८ आणि फोर्स १ कार्यालय, कृषी उद्योग विकास महामंडळाच्या कार्यालय, पशुसंवर्धन गुणनियंत्रण प्रयोगशाळा, केंद्रीय कुक्कुटपालन व विकास संघटन, मॉडर्न बेकरी कॅम्पससह परिसराची त्यांनी पाहणी केली. प्रथमदर्शनी पाहणीमध्ये या कार्यांकडे असलेल्या जागांपैकी सुमारे ६५ एकर जागा वृक्षारोपणासाठी उपलब्ध होईल, अशी माहिती समोर आली आहे. अजूनही सविस्तर अभ्यास करुन जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल सादर करावा, असे निर्देश मंत्री ॲड. शेलार यांनी दिले.

तसेच मेट्रो भवनसाठी जी जागा प्रस्तावित करण्यात आली होती, ती रिक्त असून त्या जागेवर वृक्षारोपण करता येईल का. तसेच आरे मेट्रो कारशेड मध्ये जी जागा रिक्त आहे त्यावर वृक्षारोपण करण्यात आले आहे त्याची घनता वाढविण्यासाठी काय करावे याबाबतही कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश मंत्री ॲड शेलार यांनी दिले.

### तामिळनाडूत थलपथीची हवा तर केरळमध्ये काँग्रेसची सत्ता

तामिळनाडू : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचे निकाल आज जाहीर होत असून राज्यातील राजकीय वातावरण अत्यंत चुरशीचे बनले आहे. यंदा चार प्रमुख पक्षांमध्ये थेट लढत झाल्यामुळे स्पष्ट अंदाज बांधणे कठीण ठरत आहे. मतमोजणीदरम्यान सतत बदलणारे आकडे राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची करत आहेत. अशातच अभिनेता थलपथी विजय यांच्या टीव्हीके पक्षाच्या कामगिरीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

निवडणूक आयोगाच्या ताज्या आकडेवारीनुसार एआयएडीएमके आघाडीवर असून काही जागांवर त्यांनी आघाडी घेतली आहे. दुसऱ्या क्रमांकावर विजय यांचा टीव्हीके पक्ष झपाट्याने पुढे येताना दिसत आहे. डीएमके आणि सीपीआय देखील काही जागांवर स्पर्धेत टिकून आहेत. एकूण चित्र पाहता, टीव्हीके सुमारे ८३ जागांवर आघाडीवर असल्याचे दिसत आहे, तर एआयएडीएमके ५८, डीएमके ३४, पीएमके ४, काँग्रेस ३ आणि बीजेपी १ जागेवर पुढे आहेत.

या निवडणुकीत विजय यांनी स्वत: तिरुचिरापल्ली ईस्ट आणि पेरंबूर या दोन मतदारसंघांतून उमेदवारी दिली आहे. तिरुचिरापल्ली ईस्टमध्ये ते डीएमकेच्या उमेदवारांवर आघाडीवर असून आतापर्यंत हजारो मते त्यांनी मिळवली आहेत. मात्र पेरंबूरमध्ये त्यांना मोठा धक्का बसताना दिसत असून ते मागे पडले आहेत. या मतदारसंघात अनेक उमेदवार त्यांच्यापुढे असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

दरम्यान, या निवडणुकीत टीव्हीकेने स्वत:ला 'परिवर्तनाची ताकद' म्हणून सादर केले होते. पारंपरिक द्रविड पक्षांपासून कंटाळलेल्या मतदारांना आकर्षित करण्यात आपण यशस्वी झाल्याचा पक्षाचा दावा आहे. त्यामुळे या निकालांचा परिणाम केवळ सरकार स्थापनेपुरता मर्यादित राहणार नाही, तर राज्याच्या भविष्यातील राजकारणाची दिशा ठरवणारा ठरेल.

दरम्यान, केरळ मधील विधानसभा निवडणुकांकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. येथे एकाच टप्प्यात ७९.७ टक्के मतदान झाले होते. मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांच्या नेतृत्वाखालील एलडीएफला काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफकडून कडवे आव्हान मिळत आहे. १४० जागांच्या या विधानसभेत बहुमतासाठी ७१ जागांची गरज आहे.

सध्याच्या कलांनुसार, काँग्रेस सुमारे ६३ जागांवर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी २५, कम्युनिस्ट पार्टी ९, आययूएमएल २३ आणि केईसी ७ जागांवर आघाडीवर असल्याचे दिसत आहे. त्यामुळे केरळमध्येही सत्तांतर होणार की एलडीएफ पुन्हा सत्ता राखणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एकूणच, तामिळनाडू आणि केरळ या दोन्ही राज्यांतील निवडणूक निकालांनी देशाच्या राजकीय पटलावर मोठी हालचाल निर्माण केली असून अंतिम निकालांसाठी उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्पर कार्यवाही करावी

## माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या आढावा बैठकीत सूचना

**लातूर/प्रतिनिधी** :उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असून मे महिन्यातही तापमान मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. परिणामी निलंगा मतदारसंघात पाणीटंचाई उद्भवण्याची शक्यता असून मतदारसंघातील एकाही गावाला पाणी टंचाई भासणार नाही याची खबरदारी घेवून पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्पर कार्यवाही करावी, अशी सूचना माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे.

लातूर येथील शासकीय विश्रामगृहात माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकायांच्या उपस्थितीत पाणी टंचाई आढवा बैठक घेतली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, निलंगा तहसिलदार प्रसाद कुलकर्णी, शिरुर अनंतपाळ तहसिलदार किशोर यादव, देवणी तहसिलदार सोमनाथ वाडकर यांच्यासह शिरुर अनंतपाळ पंचायत समितीचे सभापती संजय सूर्यवंशी, निलंगा पंचायत समिती सभापती सुनिता वाघमारे, देवणी पंचायत



समिती सभापती अंकिता पाटील, निलंगा नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, शिरुर अनंतपाळ नगराध्यक्ष रतन शिवणे आदींसह प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींची उपस्थिती होती.

लातूर जिल्हा पाणीटंचाईग्रस्त म्हणून ओळखला जात असला तरी पाणीटंचाईचा हा काळा पुसण्याचा प्रामाणिक प्रयत्न सातत्याने महायुती सरकारकडून होत असल्याचे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी निलंगा विधानसभा मतदार संघात पाणीटंचाई फारशी जाणवत नसल्याचे स्पष्ट केले. यापूर्वी निलंगा मतदारसंघात सिंचनाचे व पाणीपुरवठ्याचे काम अतिशय नियोजनबध्द केले असल्यामुळेच हे शक्य झाले असल्याचे सांगितले. मात्र सध्या तापमान मोठ्या प्रमाणात वाढत असून मे महिन्यातही तापमानाचा पारा वाढण्याची शक्यता हवामन खात्याने वर्तविली आहे.त्यामुळे मतदारसंघात पाणीटंचाई उद्भवणार नाही यासाठी प्रशासनाने तात्काळ ठोस पाऊले उचलून नियोजन आराखडा तयार करावा, अशी सूचना देत मतदारसंघातील प्रत्येक गावात सध्या पाण्याची परिस्थिती काय आहे याबाबत माहिती घेवून ज्या ठिकाणी पाणीटंचाई उद्धावणार आहे तेथे कोणत्या उपाययोजना करणे अपेक्षित आहे त्या पूर्ण करून घ्याव्यात, अशाही सूचना आ. निलंगेकर यांनी दिल्या.

प्रत्येक गावातील तलाठी, आणि ग्रामसेवक यांनी वेळोवेळी आढावा घेवून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चायाचीही गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच याबाबत प्रशासनास वेळोवेळी माहिती द्यावी, असे सांगून माजी मंत्री आ. निलंगेकर म्हणाले की, या माहितीच्या आधारे प्रशासनाने गांभीर्याने कार्यवाही करावी अशी सूचना केली. त्याच बरोबर नागरिकांकडून येणाया पाणीटंचाईसह इतर तक्रांरींची वेळीच दखल घेवून त्याबाबत तत्काळ उपाययोजना व्हाव्यात असेही माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सूचित केले. बैठकीच्या सुरुवातीस तिन्ही तालुक्याच्या तहसिलदारांनी आपापल्या तालुक्यातील पाणीसाठा व संभाव्य पाणीटंचाईबाबत करण्यात येत असलेल्या उपाय योजनांची माहिती दिली. यावेळी निलंगा बाजार समितीचे सभापती शिवकुमार चिंचनसुरे, देवणी बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील, शिरुर अनंतपाळ बाजार समितीचे सभापती गोविंद चिलकुरे, निलंग्याचे माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, मंगेश पाटील, निलंगा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे,देवणी तालुकाध्यक्ष शिवराज बिरादार, शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष माधव बिरादार, माजी जि.प. सदस्य डॉ.संतोष वाघमारे,प्रशांत पाटील, संभाजी पाटील तळेगावकर, नागेश जिवणे, गणेश धुमाळे आदींची उपस्थिती होती.

विविध वृत्त...

## लातूर जिल्हा व सत्र न्यायालयात ९ मे रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** :राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा व सत्र न्यायालय, तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये शनिवार, ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडीस पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे, नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट (कलम १३८) अंतर्गत धनादेश अनादर प्रकरणे, भूसंपादन, कौटुंबिक वाद आणि मोटार वाहन अपघात दावा प्रकरणे, दरखास्त प्रकरणे व कामगार/औद्योगिक न्यायालयातील प्रकरणे, बँकेशी संबंधित प्रलंबित प्रकरणे तसेच बँक तथा वित्तीय संस्थांची वाद पूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये दोन्ही पक्षांना आपली बाजू मांडण्याची समान संधी मिळते. आपापसातील संमतीने तडजोड होत असल्याने दोन्ही पक्षांचा वेळ आणि पैसा वाचतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रकरण आपापसातील संमतीने निकाली निघाल्यास भरलेले न्यायालयीन शुल्क परत मिळते. या लोकअदालतीमध्ये पक्षकार आणि विधीज्ञांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आपली प्रकरणे तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय भारुका तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एन. गिरवलकर यांनी केले आहे.

## उबाठाची साथ म्हणजे पराभवाची गॅरंटी

**मुंबई/प्रतिनिधी** : ''विधानसभा निवडणुकीच्या निकालांमधून संपूर्ण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचाच पुन्हा एकदा विजय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विरोधक हे केवळ बहाणेबाज असून, त्यांना स्वत:चा पराभव पचवता येत नाही'', अशी खरमरीत टीका भाजप नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनी सोमवारी केली. तसेच, 'जो-जो उबाठा गटासोबत गेला, त्याचे राजकीय पानिपत झाले', असा टोलाही त्यांनी लगावला.

भाजपच्या उल्लेखनीय कामगिरीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल, पुदुच्चेरी आणि आसाम या तीन राज्यांत मिळालेल्या विजयाबद्दल मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. पश्चिम बंगालमधील विजयाबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या 'एसआयआर'च्या मुद्द्यावर शेलार यांनी तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, ''पश्चिम बंगालमध्ये जर एसआयआरचा प्रभाव होता, तर केरळमधील निकालांना विरोधक काय म्हणणार? त्यांनी सर्वप्रथम आरशात पाहावे. विरोधक हे अत्यंत डरपोक आणि रडके आहेत. वस्तुस्थितीचा सामना करण्याची त्यांची तयारी नसते, त्यामुळेच ते पराभवाचे खापर सरकारी यंत्रणांवर फोडण्याचा प्रयत्न करतात. पराभवाचे खापर फोडण्याऐवजी विरोधकांनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे'', असे ते म्हणाले.

'उबाठा'च्या संगतीचा परिणाम

'उबाठा' गटाच्या राजकीय भूमिकांवर निशाणा साधताना आशिष शेलार यांनी अनेक दाखले दिले. ''तामिळनाडूत स्टॅलिन यांची बाजू घेणे असो, किंवा पश्चिम बंगालमध्ये मम ता बॅनर्जी यांना दिलेला पाठिंबा असो, जो-जो उबाठासोबत गेला त्याचा पराभव झाला हे स्पष्ट चित्र आहे. महाराष्ट्रातील पोटनिवडणुकांचे निकाल हे महायुतीच्या विकासाच्या राजकारणावर जनतेने दिलेला कौल आहे,'' असे सांगत शेलार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले.

## राहुरीत अक्षय कर्डिलेंचा मोठा विजय; शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे गोविंद मोकाटे पराभूत

**मुंबई/प्रतिनिधी** : देशातील ५ राज्यांच्या विधानसभा आणि महाराष्ट्रातील दोन मतदारसंघात घेण्यात आलेल्या पोटनिवडणुकांचे निकाल आज लागले असून अपेक्षेप्रमाणे बारामती आण राहुरी मतदारसंघात महायुतीच्या दोन्ही उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री उमेदवार सुनेत्रा पवार यांनी मताधिक्याचा विक्रम नोंदवला आहे. सुनेत्रा पवार यांना २३ व्या फेरीअखेर तब्बल २ लाख १४ हजार ८५६ मतांची आघाडी होती. मात्र, शेवटच्या फेरीअखेर सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. हे देशातील सर्वाधिक विधानसभा मताधिक्य असल्याचं सांगण्यात येत आहे. दुसरीकडे राहुरी विधानसभा मतदारसंघात भाजपच्या अक्षय कर्डिले यांनी देखील १ लाखांच्या मताधिक्याचा टप्पा पार केला आहे.

राज्यातील बारामती विधानसभा आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान घेण्यात आले. येथील मतदारसंघाच्या आमदारांचे निधन झाल्याने येथे पोटनिवडणूक लागली होती. बारामतीमध्ये अजित पवार आणि राहुरीत शिवाजीराव कर्डिले यांचे अकाली निधन झाल्यामुळे येथील मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत दोन्ही उमेदवारांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे. राहुरीत २६ व्या फेरी अखेर भाजपचे अक्षय कर्डीले १,०७, ४८५ मतांनी आघाडीवर होते. येथे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना २६,९६१ मते मिळाली असून वंचित बहुजन आघाडीच्या संतोष चोळकेंना ५,५१८ मतं पडली आहेत. याशिवाय, अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे यांना ७,२०७ मतं मिळाली असून लाखांच्या फरकाने अक्षय कर्डिले आमदार बनले आहेत.

राहुरी विधानसभा मतदारसंघात शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांना तिकीट देण्यात आले होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आणि भाजप नेत्यांनी भेट घेतल्यानंतर तनपुरे यांनी उमेदवारी स्वीकारली नाही. त्यामुळे, राष्ट्रवादीने रासाहेब खेवरे यांना निवडणुकीच्या मैदानात उतरवले होते. मात्र, खेवरे यांना निवडणुकीत जनतेनं नाकारल्याचं दिसून येत आहे.

# कामगार हिताचे कायदे रद्द करून कामगारांची मुस्कटदाबी केली जातेय : हनुमंत पवार

### लातूर येथील अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या कामगार मेळाव्यात कामगारांच्या प्रश्नावर मंथन

**लातूर/प्रतिनिधी** : महात्मा फ ुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नारायण मेघाजी लोखंडे यांच्या परिश्रमातून कामगारांच्या हिताचे झालेले कायदे आजचे भाजपचे केंद्र आणि राज्यातील सरकार कामगार कायदे रद्द करून कामगारांना गुलाम करून त्यांची मुस्कटदाबी करत आहे. त्याविरोधात कामगारांनी पेटून उठण्याची गरज आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र काँग्रेचे प्रवक्ते हनुमंत पवार यांनी लातूर येथे केले.

लातूर येथे अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या ३ मे रोजी दगडोजीराव देशमुख सभागृहात आयोजित जिल्हा कामगार मेळाव्यात ते बोलत होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मंगलताई शिंदे या होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मोदी सरकारची धोरणे न पटल्याने राजीनामा देऊन रस्त्यावरच्या लढाईत उतरलेले केरळचे सनदी अधिकारी कन्नन गोपीनाथ नायर, असंघटीत कामगार कर्मचारी काँग्रेसचे अध्यक्ष तथा पुणे मनपाचे नगरसेवक सुनील शिंदे, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर, भटक्या विमुक्ताचे नेते प्रा. सुधीर अनवले, नूतन अंगरखे,महाराष्ट्र विकास आघाडीचे बसवंत उबाळे, इंजि. शेख शफी, शिवाजी भंडारे, सुरेश काटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

हनुमंत पवार पुढे म्हणाले, केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणविरुद शेतकऱ्यांनी बोलायचे नाही, कामगारांनी बोलायचं नाही, विद्यार्थ्यांनी बोलायचे नाही, अशा परिस्थितीत तुम्ही कामगार मेळावा घेऊन बोलत आहात. त्यामुळे मी केव्हाही छातीचा कोट करून तुमच्या सोबत असेल. तर देशही जनता आहे. पण काही उद्योगपती, सरकार म्हणजे देश समजला जातोय. जनता म्हणजे आपली प्रगती झाली तर देशाची प्रगती होईल. सध्या दोन विचारधारांची लढाई आहे. देशाच्या प्रगतीच्या विरोधात केंद्र सरकार व्हीलन आहे. असे मत कन्नन गोपीनाथन यांनी व्यक्त केले.

तसेच सुनील शिंदे यांनी कामगारांना सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, केंद्र सरकारने कामगारांचे २९ कायदे रद्द करून चार काळे कायदे केले. ते एकतर्फी केले आहेत. कामगार संघटनाना विचारात घेतलेले नाही. या कायद्याच्या विरोधात आपण मूग गिळून बसतो. आपणच आपल्यासाठी घातक आहोत.

हे आपण समजून घेतले पाहिजे. राजकुमार होळीकर यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. आणि राजकुमार होळीकर यांनी आपल्या प्रस्ताविकात कामगार कायदे, आजची आव्हाने याबद्दल सविस्तर सांगितले. ते म्हणाले, सरकारने नवीन केलेल्या चार लेबर कोड मध्ये कामाचे





तास आठ वरून पुन्हा बारा करण्यात आलेले आहेत. आणि इतर नुकसानदायी बाबी आहे. असा उलट्या दिशेने प्रवास सुरु आहे. मोदी सरकारच्या विरोधात बोलणे सरकारने अवघड करून ठेवले आहे. जन सुरक्षा कायद्याच्या माध्यमातून मोर्चा, आंदोलने करणाऱ्यांना अटकाव घातला आहे. भारतीय कामगार परिषद रद्द केली आहे. त्यामुळे या व्यवस्थेविरोधात तमाम कामगारांनी संघटित होण्याची गरज आहे. गत निवडणुकीत भाजपला मतदान करू नका अशी भूमिका आम्ही घेतली होती. यावेळी उत्कृष्ठ कार्यकर्ता म्हणून अण्णाराव सूर्यवंशी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तर महेंद्र कांबळे यांनी सर्व मान्यवरांना शिवाजी कोण होता हे पुस्तक भेट दिले. मेळाव्याचे उत्कृष्ठ असे सूत्रसंचालन ॲड. शिरीष दहिवाल यांनी केले. मेळाव्यासाठी प्रमोद बनाटे, किशोर सगर, भागवत पांचाळ, नेताजी बनसोडे, बळीराम कांबळे, राजाभाऊ वटनुरे, अंजली येदले, अंजनाताई सगट, अंकुश टकळगे, रेणुकाताई कांबळे, सुषमाताई मिटकरी, राजकुमार भंडे, सुधीर कांबळे, लहू जगताप, पंडित गायकवाड, गौतम ससाणे, सिकंदर लोखंडे, परमेश्वर कांबळे, रांनी लोढा, प्रल्हाद कलवले आदिनी परिश्रम घेतले.

### कामगार मेळाव्यातील पाच मंजूर ठराव

कंत्राटी कामगार, कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे, भारतीय कामगार परिषद दर दोन वर्षांनी घ्यावी, नवीन चार नवीन कायदे अर्थात लेबर कोड रद्द करण्यात यावेत.महाराष्ट्र इमारत बांधकाम इतर कामगार मंडळात अधिकारी, कर्मचारी, मालक प्रतिनिधी, अशासकीय प्रतिनिधी कायमस्वरूपी नियुक्त करावेत. बांधकाम कामगारांच्या पाल्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्याबद्दलचे १ जानेवारीचे परिपत्रक रद्द करावे. आदी ठराव अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी मांडले. ते एकमताने मंजूर करण्यात आले.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून महाराष्ट्रातील प्रस्तावित हाय-स्पीड राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचा आढावा



नवी दिल्ली दि. ४ : महाराष्ट्रातील विविध महत्त्वपूर्ण महामार्ग विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी राज्यातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या आणि प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्रातील रस्ते संपर्क अधिक सक्षम करणे, लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढविणे आणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी प्रकल्पांच्या नियोजन व अंमलबजावणी प्रक्रियेला गती देणे या उद्देशाने ही आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी नागपूर-भंडारा टप्प्याचे सहा पदरीकरण, तळोदा-बुऱ्हाणपूर टप्प्याचे चार पदरीकरण, दुर्ग-गडचिरोली-मंचेरियाल कॉरिडॉर, गडचिरोली-कांकेर (रायपूर-विशाखापट्टणम) कॉरिडॉर, ग्वाल्हेर-नागपूर कॉरिडॉर, नागपूर-हैदराबाद कॉरिडॉर, भंडारा-रायपूर टप्प्याचे सहा पदरीकरण, लखनादोन-दुर्ग-रायपूर कॉरिडॉर, नागपूर-अमरावती टप्प्याचे सहा पदरीकरण, एनएच-४४ वरील मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमा-नागपूर बायपास-बोरखेडी टप्प्याचे तसेच पुणे-सातारा टप्प्याचे सहा पदरीकरण या प्रकल्पांचा समावेश होता.


या बैठकीत महाराष्ट्रातील राष्ट्रीय महामार्गांवरील एकूण ५२७ किमी लांबीच्या नऊ बीओटी प्रकल्पांचाही सखोल आढावा घेण्यात आला. यात शिरूर-अहिल्यानगर, अहिल्यानगर-वडाळा, वडाळा-छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर-जालना, जालना-वातूर, नांदेड-नरसी-देगलूर, जाम-वरोरा, वरोरा-चंद्रपूर-बामणी आणि मलकापूर-चिखली या कॉरिडॉरचा समावेश आहे.

## मेंदूला सकारात्मक दिशेने प्रशिक्षित करा

### मनशक्ती मुख्य अभ्यासक्रम समन्वयक मयूर चंदने

### टेक-वारी २.० सप्ताह अंतर्गत ऑप्टिमायजिंग दि ब्रेन कॅपॅसिटीस' या विषयावर मार्गदर्शन

**मुंबई/प्रतिनिधी** : मानवाने कोणतीही संधी नाकारण्यापेक्षा ती स्वीकारून स्वतःचा विकास साधावा. 'जस्ट डू इट' आणि 'ट्रेन युअर माईंड अँड चेंज युअर ब्रेन' हे मंत्र आत्मसात करावे. मनाचे नियोजन करा आणि मेंदूला सकारात्मक दिशेने प्रशिक्षित करा, असे मनशक्तीचे मुख्य अभ्यासक्रम समन्वयक मयूर चंदने यांनी सांगितले




मंत्रालयात टेक-वारी २.० या सप्ताह अंतर्गत 'ऑप्टिमायजिंग दि ब्रेन कॅपॅसिटीस' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य अभ्यासक्रम समन्वयक मयूर चंदने म्हणाले, कोणतेही काम कठीण वाटले किंवा हे माझे काम नाही असे म्हणत टाळाटाळ केल्यास आपण नव्या संधी गमावतो. यामुळे मेंदूला नव्या गोष्टी शिकण्याची आणि नवीन न्यूरॉन्स सक्रिय होण्याची संधी मिळत नाही. चित्र काढणे, बोलणे, कथा किंवा कविता लिहिणे अशा कोणत्याही कृतीसमोर भीती न बाळगता पुढे जाणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

मानवी मेंदूचे वजन साधारणपणे १३५० ग्राम असते. मानव प्रचंड क्षमता घेऊन जन्माला आला आहे. आपण ज्या पॅटर्नमध्ये असतो तो पॅटर्न मोडू शकतो. मानवी मेंदू हा उजव्या आणि डाव्या भागांमध्ये विभागला आहे. दोन्ही मेंदू मधला संवाद होणे अपेक्षित आहे. वापरा नाही तर संपुष्टात येईल ही संकल्पना स्पष्ट करताना चंदने यांनी अनेक उदाहरणे आणि प्रात्यक्षिके देत मानवी मेंदूचे कार्य सांगितले.

प्रत्येक आव्हानाला 'जस्ट डू इट' या भावनेने सामोरे गेल्यास मेंदूचा विकास होऊन व्यक्तीचे कल्याण साध्य होऊ शकते. सकारात्मक विचार आणि कृतीशीलता अंगीकारण्याचे आवाहन चंदने यांनी यावेळी केले.

# महात्मा बसवेश्वरमध्ये सार्थक संजय गवई याचा सत्कार; दिव्यांग प्रवर्गातून महाविद्यालयातून प्रथम

**लातूर/प्रतिनिधी** : महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेतील विद्यार्थी सार्थक संजय गवई याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा मार्फत फेब्रु/मार्च-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये दिव्यांग प्रवर्गातून महाविद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. त्याने मिळविलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल त्याचा आणि पालक प्रो.डॉ.संजय गवई यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे आणि मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी यांच्या हस्ते ग्रंथ, पुष्पहार व पेढे देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, पर्यवेक्षक डॉ.गुणवंत बिरादार, रत्नेश्वर स्वामी, सर्व शाखा समन्वयक, शिक्षक, गुणवंत विद्यार्थी, पालक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. बारावी बोर्ड परीक्षेमध्ये त्याने व्होकल लाईट म्युझिकमध्ये १०० पैकी तब्बल ९८ गुण प्राप्त केले असून पाली या विषयांमध्ये ६२ गुण मिळाले आहे. तसेच इंग्रजी, तत्वज्ञान, मानसशास्त्र आणि भारतीय संगीताचा इतिहास आणि विकास आदि सर्व विषयांमध्ये उज्ज्वल यश संपादन केले आहे.

यावेळी मनोगत व्यक्त करताना सार्थक गवई म्हणाला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १८ तास अभ्यास करून या देशाला भारतीय संविधान दिले. ज्यामुळे भारताची लोकशाही बळकट आणि सक्षम झाली आहे. आपण आपल्या आयुष्यामध्ये अपयशाने खचून न जाता जिद्द, कष्ट, सातत्य, नियमित वर्ग आणि शिक्षकांशी चर्चा करून अडचणीवर मात केली पाहिजे.

जगामध्ये अशक्य गोष्टी कठोर परिश्रमातून आपल्याला मिळविता येतात असे सांगून महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, मुख्य समन्वयक, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शाखा समन्वयक, प्रा.व्ही.जी.स्वामी, प्रा.रवींद्र सोनोने, प्रा.शिवशंकर कामाजी, प्रा.प्रवीण पोटभरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी गोपाल तिरूमले, सोपान सुतार, लेखनिक चंद्रमणी रमेश कांबळे आणि विद्यार्थी यांचे आभार मानले.

तसेच त्याचा कौटुंबिक सत्कार दुर्वासराव गवई यांच्या हस्ते शाल, पुष्पहार, भारतीय संविधान आणि पेढे देऊन करण्यात आला. निर्मला गवई, ममता गवई, संयम गवई, सुमित भडके, प्रज्ज्वल जाजे, गोविंद देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी सुद्धा त्याने मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.



त्याच्या या यशाबद्दल आनंदी व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. राजकुमार गवळे, अंजली पाटील, नाबार्डचे जिल्हा प्रबंधक श्रीराम वाघमारे, प्रा.रंजीता वाघमारे, निरंतर योग केंद्रातील सर्व योग साधक आणि वेलकम मॉर्निंग ग्रुपमधील सर्व सदस्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.